
Proceedings Book of National Seminar

# संशोधन पद्धती

## Research Methodology



डॉ.संजय वाघमारे
(प्राचार्य)

डॉ.ओमशिवा लिगाडे
(समन्वयक)

संपादक
प्रा.अमोल पगार
डॉ.लहू वाघमारे
डॉ.विनोद सोनवणे
डॉ.अरविंद कदम
डॉ.चंद्रशेखर ढोले
प्रा.रामराव चव्हाण

Scanned by CamScanner

PROCEEDINGS BOOK OF NATIONAL SEMINAR

# संशोधन पद्धती (Research Methodology)

संपादक - प्रा.अमोल पगार, डॉ.लहू वाघमारे, डॉ.विनोद सोनवणे
डॉ.अरविंद कदम, डॉ.चंद्रशेखर डोले, प्रा.रामराव चव्हाण

ISBN 978-93-5240-186-4

अरुणा प्रकाशन
१०३, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर
मो. ९४२१४८६९३५, ९४२१३७१७५७

© सर्व हक्क लेखकाधीन

: प्रथम आवृत्ती :- २२ ऑगस्ट २०१८

: मुद्रक : आर्टी ऑफसेट, लातूर

अक्षर जुळवणी : हिंदवी कॉम्प्युटर, लातूर

मुखपृष्ठ रेखाटन :- विरू गुळवे ८६००८८११२७

मूल्य : ५००.०० रुपये

*"संशोधन पद्धती" या प्रोसेडींग बूक मधील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांचे असून त्यास संपादक, प्रकाशन, मुद्रक व वितरक सहमत असतीलच असे नाही.

49. Chapeterization of Research Topic in Social Sciences ........... २१७
**Ranjeet R. Patil**

५०. संशोधन आणि सांख्यिकीय विश्लेषणाची वैशिष्ट्ये
**प्रा.हुडगे मधुबाला, श्री सातलिंग गौंड** ........... २२०

५१. सामाजिक संशोधनाच्या दृष्टिकोनातून गृहीतके व
प्रश्नावली पध्दतीचा चिकित्सक अभ्यास ........... २२३
**डॉ. संजीव एच. कोळपे, प्रा. एन.एस. भेंडेकर**

52. Types of Educational Research
**Dr. Sucheta J. Sankpal.** ........... २३०

५३. ऐतिहासिक संशोधन आणि कार्यकारणभाव
**कु. हसनाबादे कोमल, कु. खटके वर्षाराणी** ........... २३३

54. "Hypothesis of Research"
**Neeta R. Patil** ........... २३७

५५. संशोधनासाठी संदर्भ ग्रंथांचे महत्त्व
**इंदिरा अशोक लोखंडे** ........... २४३

५६. संशोधन पध्दतीत प्रश्नावलीची मांडणी
**प्रा.डॉ.एम.डी. कच्छवे** ........... २४७

५७. संशोधनाची गृहितकृत्ये संशोधन प्रक्रियेतील : एक धागा
**प्रा. डॉ. बाळू आत्माराम कांबळे** ........... २५०

५८. सामाजिक संशोधनात गृहितकृत्याचे महत्त्व
**खडके सुरेखा बाबुराव** ........... २५३

५९. संशोधनात मुलाखतीची भुमिका
**डॉ. किसन आर.पालके** ........... २५५

६०. समाजशास्त्रीय संशोधनातील तथ्य संकलनाच्या पद्धती
**सूर्यवाड किशोर जळबा** ........... २५७

६१. तथ्य संकलन
**प्रा. लंजीले प्रदीप मारोती** ........... २६२

62. Types of Research
**R. R. Borse** ........... २६५

६३. सामाजिक संशोधनातील तथ्यसंकलन आणि प्रश्नावली
**प्रा. मेकेवाड व्ही.बी.** ........... २६८

64. Importance of Questionnaires in Historical Research ........... २७१
**Dr. Rambhau R. Mutkule**

65. TECHNIQUES OF DATA COLLECTION IN RESEARCH ........ २७३
**Dr.Baswaraj Nagnathrao Nagalgave**

Scanned by CamScanner

५१.

# सामाजिक संशोधनाच्या दृष्टिकोनातून गृहीतके व प्रश्नावली पध्दतीचा चिकित्सक अभ्यास

डॉ. संजीव एच. कोळपे
भूगोल विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड

प्रा. एन.एस. भेंडेकर
हिंदी विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड

**प्रस्तावना :** संशोधन म्हणजे नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी पद्धतशीर केलेले प्रयत्न होय (रेडमेन व मोरी) संशोधन हे वस्तू, संकल्पना, प्रतिके इत्यादींना कुशलतापूर्वक व्यवस्थित करते, ज्याचा मुख्य उद्देश सामान्यीकरनातुन ज्ञानाचा विकास, प्रामाणिकता अथवा वास्तविकतेचे परीक्षण असते. मग ते ज्ञान व्यावहारिक उपयोगीतेचे असो की कलेचे, सामाजिक शास्त्रातुन संशोधनात अध्ययन विषय, नियंत्रण, मापन आणि विश्लेषण विषयक समस्या निरनिराळया आहेत. सामाजिक शास्त्राच्या क्षेत्रात कारणांची विविधता ही महत्वाची आहे. संशोधनाचा संबंध प्रामुख्याने सामाजिक घटनांशीच असल्यामुळे मानवी वर्तन, मानवाच्या सामाजिक विश्वाचे अध्ययन करणे आणि त्यांना समजुन घेणे हाच सामाजिक संशोधनाचा उद्देश असतो.

**सामाजिक संशोधन :** सामाजिक संशोधन एक शास्त्रीय पद्धती असुन जिचा उद्देश तार्किक आणि क्रमबद्ध या पद्धतींद्वारा नवीन तथ्यांचा शोध घेणे किंवा जुन्या तथ्यांचे पुनर्परीक्षण करणे व त्यांच्यात आढळुन येणारे अनुक्रम अंत:संबंधी कार्यकारणभाव आणि त्यांना संचालित करणाऱ्या नैसर्गिक नियमांचे विश्लेषण करणे हा आहे. सामाजिक संशोधन ही संकल्पना समाज आणि संशोधन या क्षेत्राशी निगडित आहे. या दोन शब्दांनी मिळुनच सामाजिक संशोधन हा शब्द तयार झाला आहे. त्यातील संशोधन म्हणजे नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी केलेले पद्धतशीर प्रयत्न होत. अर्थात संशोधन ही बौद्धिक प्रक्रिया असून तिच्याद्वारे नवीन ज्ञान प्रकाशात आणले जाते. तसेच जुन्या ज्ञानातील उणिवा सुधारून त्यात नवनवीन ज्ञानाची भर घातली जाते.

सामाजिक संशोधनातील सामाजिक हा एकच शब्द प्राकृतिक क्षेत्राच्या संशोधनापासुन त्याला वेगळे करतो. कोणतेही संशोधन हे जेंव्हा सामाजिक तथ्य, घटना, सिद्धांत आणि नवीन ज्ञान हया बाबी संबंधित असेल, तेंव्हा त्याला सामाजिक संशोधन म्हणता येईल. कोणत्याही सामाजिक समस्या सोडविण्याकरिता किंवा कोणत्याही गृहीतकृत्यांचे परीक्षण करण्याकरिता,



Scanned by CamScanner

नवीन घटनांचा शोध घेण्याकरिता, विशिष्ट घटनांमधील नवीन संबंध शोधण्याच्या उद्देशाने कोणत्या तरी योग्य पद्धतीचा उपयोग करणे हा सामाजिक संशोधनाचा हेतू आहे.

**गृहीतकृत्य :** सामाजिक संशोधनात समस्या सूत्राणानंतरचा टप्पा म्हणजे गृहीतकाची निर्मिती गृहीतक हा शब्द Hypothesis या शब्दाचा अनुवाद आहे. Hypothesis हा शब्द ग्रीक भाषेतील Hypo व Thesis या दोन शब्दांपासून बनलेला असून Hypo म्हणजे Below याचा अर्थ च्या पेक्षा खाली तसेच Thesis म्हणजे Theory चा अर्थ विचार किंवा सिद्धांत होय. म्हणजे Hypothesis चा अर्थ Below Theory म्हणजे सिद्धांताच्या खाली अर्थात सिद्धांताचे पूर्वकथन किंवा गृहीतक असा होतो. गृहीतकृत्ये हे असे विधान किंवा संशोधनकार्यापुढे असणारा असा एखादा प्रश्न आहे की, ज्या प्रश्नांच्या संदर्भात माहिती संकलित करून त्याची सत्यता पडताळुन पाहावयाची असते. संशोधनाला एक निश्चित दिशा देण्याच्या दृष्टिकोनातून किंवा संशोधन एक विशिष्ट दिशेने केंद्रित करण्याच्या दृष्टिकोनातुन गृहीतकृत्य महत्वाची असतात. तसेच गृहीतकृत्य सिद्धांत आणि संशोधन यातील महत्वाचा दूवा असतो. गृहीतकृत्यांची निर्मिती करणे म्हणजे संशोधनाचे अंतिम ध्येय नव्हे, तर हा संशोधनाचा आरंभबिंदु आहे.

तथ्यांच्या विषयाबाबत सामान्य ज्ञानाच्या आधारावर एक शास्त्रज्ञ प्रयत्न किंवा परीक्षण या द्वारा चुक सुधारण्याच्या पद्धतीद्वारा अशा विशिष्ट घटकांना निवडले जाते की, जे अध्ययन समस्येवर प्रकाश टाकु शकते. काल्पनिक विचार किंवा धूलकल्पनाद्वारे तो तथ्यांच्या विभिन्न वर्गांमध्ये कारणात्मक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो. ही सुक्ष्म कल्पना, तात्पुरता मध्यवर्ती महत्वपूर्ण विचार जो फलयुक्त संशोधनाचा एक आधार बनतो. त्या कार्यवाहक विचाराला गृहीतकृत्य म्हणतात.

**गृहीतकृत्याचे प्रकार :** संशोधन पातळीवर गृहीतकृत्याची उपयोगिता असल्यामुळे संशोधनात गृहीतकृत्याचा उपयोग केला जातो. संशोधन विषयाच्या स्वरूपानुसार गृहीतकृत्याचे स्वरूप अवलंबून असते. त्यानुसार सामाजिक शात्रात गृहीतकृत्याचे अनेक प्रकार आहेत.

**अ. प्रायोगिक गृहीतकृत्य :**

साधारणत: प्रायोगिक संशोधनात चार प्रकारच्या गृहीतकृत्यांचा उपयोग केला जातो.

**१. अस्तित्वपरक गृहीतकृत्य :** या गृहीतकृत्याचा संबंध वर्तमान स्थितीशी तसेच स्थानिक व व्यक्तिगत संशोधनाशी येतो. या प्रकारच्या संशोधनात महत्वपूर्ण बाब असते, की या अंतर्गत केवळ एकाच घटकाचे गहन अध्ययन केले जाते व यातून निघणारे निष्कर्ष वैज्ञानिक स्वरूपाचे असतात. या संदर्भात एबीनघॉस (Abbinghas) यांचे उदाहरण देता येऊ शकेल. त्यांनी स्वत:वरच प्रयोग केले व त्यातून त्यांना स्मरणासंबंधीच्या ज्ञानाबाबतचा सिद्धांत मांडता



Scanned by CamScanner

आला आहे.

**२. सांख्यिकीय गृहीतकृत्य :** या गृहीतकृत्यात संबंधित चलाच्या प्रकार्यात्मक संबंधाच्या अध्ययनाकरिता उपयुक्त सांख्यिकीय परीक्षणाचा उपयोग सुविधापूर्वक केला जातो. किर्क (Kirk) यांच्या मते, सांख्यिकीय गृहीतकृत्याचा संबंध एक किंवा एकापेक्षा अधिक चलांशी असतो व हा संबंध एका अशा स्थितीत असतो, की जो सत्य होऊ शकते सांख्यिकीय गृहीतकृत्याचे दोन उपप्रकार पडतात.

**I. निराकरणीय गृहीतकृत्य :** हे गृहीतकृत्या सकारात्मक किंवा नकारात्मक असत नाही तर ते तटस्थ असते. तथ्य संकल्पनाच्या बाबतीत संशोधकाचा पूर्वग्रहदुषित दृष्टिकोन टाळणे हा या गृहीतकृत्याचा प्रमुख हेतू असतो. निराकरणीय गृहीतकृत्य हे विधिशास्त्राच्या सिद्धांतावर आधारित असते की, एक व्यक्ती तोपर्यंत निर्दोष मानली जाईल जोपर्यंत ती दोषी ठरणार नाही. या प्रकारच्या गृहीतकृत्याद्वारा हाती येणारे निष्कर्ष कठोर वैज्ञानिक मापदंडावर आधारित असतात. व त्याच्या विश्वसनीयतेचा स्तर हा उच्च श्रेणीचा असतो.

**II प्रायोगिक गृहीतकृत्य :** हे गृहीतकृत्य दोन समूहातील व्यवहारांमधील अंतराचे भविष्यकथन करते. सामान्यतः समूहांमध्ये अभिक्रियांची मात्रा अलग अलग असते. म्हणून संशोधनकर्ता संख्यांच्या माध्यमातून प्रायोगिक गृहीतकृत्याला पुष्टी देत असतो असे मॅथेसन (Matheson) यांचे मत आहे. या गृहीतकृत्याची दोन रूपाने मांडणी केली जाते.

**A . सकारात्मक गृहीतकृत्य :** या गृहीतकृत्याला संशोधनात्मक मांडणी सकारात्मक स्वरूपाची असते. देण्यात आलेल्या दोन समूहांपैकी एक समूह निश्चितरूपाने दुसऱ्या समूहापेक्षा श्रेष्ठ आहे. अशी मांडणी या गृहीतकृत्यात केली जाते. उदा: ग्रामापेक्षा नगरात परिवर्तनाची प्रक्रिया वेगाने घडते.

**B. नकारात्मक गृहीतकृत्य :** या गृहीतकृत्यात संशोधनात्मक मांडणी नकारात्मक दृष्टीने केलेली असते. दोन समूहांतील एक समूह योग्यतेच्या दृष्टिकोनातून कनिष्ठ मानला जातो. नकारात्मक गृहीतकृत्यात मध्यमानाच्या अंतराच्या सार्थकतेची पडताळणी केली जाते.

**३. संकल्पनात्मक गृहीतकृत्य :** जेंव्हा एखादे गृहीतकृत्य स्वतंत्र, चल तसेच आश्रित चल यातील संबंधाच्या विषयाचे संक्षिप्त कथन करते तेंव्हा ते संकल्पनात्मक गृहीतकृत्य म्हणून संबोधले जाते. या गृहीतकृत्याची रचना प्रायोगिक प्रतिरूपावर आधारित केली जाते.

**४. सार्वभौमिक गृहीतकृत्य :** या गृहीतकृत्याचा उद्देश संबंधित चलांशी संबंध स्थापित करणे हा असतो. ज्याचे स्वरूप निष्कर्षा आधारे सामान्य नियमांची रचना करावी लागते. जी देश कालपरत्वे योग्य किंवा वैध ठरू शकेल. सार्वभौमिक गृहीतकृत्याची रचना केवळ अशा स्थितीत संभव असते की जेंव्हा एक विषयाचे ज्ञान भांडार पर्याप्त रूपाने वैज्ञानिक स्तरावर



Scanned by CamScanner

विकसित झालेले असतात

**ब . अप्रायोगिक गृहीतकृत्य :** या गृहीतकृत्याची साधरणत: तीन प्रकारात विभागणी केली जाते. असे हेज यांचे मत आहे.

**१. साधारण स्तरांवरील गृहीतकृत्य :** या गृहितकृत्या अंतर्गत हेज यांनी अशा गृहीतकृत्यांचे वर्णन केले आहे की, ज्यात दोन चलांमधील परस्पर सह संबंधांचे अध्ययन व परीक्षण केले जाते. अशा संशोधनात केवळ संख्यात्मक संकलन तसेच साधारण वर्गीकरण करणे पर्याप्त स्वरूपाचे असते.

**२. विशिष्ठ स्तरांवरील गृहीतकृत्य :** या संशोधनात संबंधीत चल व घटानांच्या प्रकार्यात्मक संबंधाचे व कार्यकारण संबंधांचे अध्ययन करणे भाग असते. तेंव्हा विशिष्ट स्तरावरील गृहीतकृत्ये मांडले जाते.

**३. विषमस्तरांवरील गृहीतकृत्य :** या गृहीतकृत्यात एकापेक्षा अधिक चल अभ्यासास घेवून त्यांच्या सहसबंधाचे सांख्यिकीय पद्धतीच्या माध्यमातून व्यापक स्वरूपाचे अध्ययन केले जाते. या गृहीतकृत्यात आकेवारीचे संकलन, वर्गीकरण तसेच विश्लेषण मोठया प्रमाणात असते. त्यामुळेच अशा संशोधनाशी संबंधीत गृहीतकृत्याला विषमस्तरांवरील गृहीतकृत्य असे संबोधले जाते. वरील प्रकाराशिवाय आदर्श गृहीतकृत्य, वर्णनात्मक गृहीतकृत्य. संबंधात्मक गृहीतकृत्य, विश्लेषणात्मक गृहीतकृत्य असे गृहीतकृत्याचे प्रकार सांगितले जातात.

**गृहीतकृत्यांची कार्ये :**

संशोधनाच्या संदर्भात गृहीतकृत्याचे कार्ये पुढील प्रमाणे वर्णन करता येईल.

**१. समस्येची व्याख्या करण्यास साहाय्यभूत :** संशोधनात समस्येची व्याख्या कार्यकारक संबंधानुरूप केली जाते. या करिता गृहीतकृत्य विशेष साहाय्यभूत ठरते. संशोधनात समस्येची व्याख्या गृहीतकाच्या रूपातच करण्यात येत असते. गुड व हॅट यांच्या मते व्यावहारिक गृहीतक शास्त्रीय संशोधनाची समस्या स्पष्ट व सुनिश्चित, तसेच सीमित स्वरूपात मांडण्यास साहाय्यभूत ठरते.

**२. गृहीतक संशोधनाचे प्रेरक असते :** संशोधन कार्यात जोपर्यंत गृहीतकाची रचना करण्यात येत नाही तोपर्यंत एक संशोधनात एक प्रकारची शैथिल्य असते, परंतु गृहीतकाची रचना पूर्ण होताच संशोधनकार्यात एक प्रकारची चेतना प्राप्त होत.

**३. तथ्य संकलनाकरिता साहाय्यभूत :** गृहीतक केवळ अध्ययनाच्या क्षेत्रालाच सीमित करते असे नाही तर, अध्ययन क्षेत्राशी संबंधित तर्कसंगत तथ्यांचे संकलन करण्यात साहाय्यभूत ठरून त्याला दिशा प्रदान करण्याचे कामही करते.

**४. चलांतील सहचर्यात्मक सहसंबंधाचे निर्देशन करणे :** गृहीतकृत्यातुन केवळ



Scanned by CamScanner

घटनेशी संबंधित चलांचाच शोध घेतला जातो असे नही तर चलांच्या अध्ययनातून चलांच्या साहचर्यात्मक संबंधाचाही शोध घेतला जातो.

**५. तर्कसंगत निष्कर्षामध्ये साहाय्य :** सामाजिक संशोधन गृहीतकाच्या निर्मितीने प्रारंभ होऊन शेवटी निष्कर्षापर्यंत पोहचण्यात साहाय्यभूत ठरते. कारण तथ्यांचे संकलन, वर्गीकरण आणि सारणीकरण गृहीतकांना लक्षात घेवून केले जाते व त्यानंतरच निष्कर्ष काढला जातो. संशोधन कर्त्याला निष्कर्ष काढताना गृहीतक विशेष साहाय्यभूत ठरते. त्याला निष्कर्षामध्ये तर्कपूर्ण असा आधार देवून सिद्ध करावे लागते, की अध्ययनाच्या सुरूवातीला जे गृहीतक हाती घेतले होते ते सत्य ठरले किंवा असत्य.

**६. सामाजिक घटनेचे वर्णन करन :** गृहीतक ज्या सामाजिक घटनेशी संबंधित असते त्या घटनेच्या संदर्भात माहिती गृहीतक वर्णन करते. गृहीतक घटनांच्या संबंधित वेगवेगळया तथ्यांना संघटित करून घटनांच्या संबंधित ज्ञान प्राप्त करण्याचे काम करते.

**७. वेळेची व पैशांची बचत :** गृहीतकांमध्ये संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या माहितीवरच लक्ष केंद्रित केले जाते. त्यामुळे संशोधनासाठी आवश्यक असणारी तथ्ये व माहिती गोळा होऊ शकते. अनावश्यक माहिती व होणारा वेळेचा अपव्यय व पैशांचा अपव्यय वाचू शकतो.

**सारान्ताकोस यांनी गृहीतकाची तीन कार्ये नमुद केली आहे :**

१. संरचना व क्रियात्मकतेला निर्देशित करून संशोधन कर्त्याला संशोधनात दिशादर्शन करणे.

२. संशोधन प्रश्नांचे प्राथमिक उत्तर प्रदान करणे.

३. चलांच्या सांख्यिकीय विश्लेषणात सुविधा प्रदान करणे.

थोडक्यात गृहीतकाच्या प्रमुख कार्यात सिद्धांताचे परीक्षण करणे, सामाजिक घटनांचे वर्णन करणे, सिद्धांत निर्मितीस साहाय्यभूत ठरणे इत्यादी कार्ये महत्वाची ठरतात.

**प्रश्नावली :** एका विषयासंदर्भात व्यक्तीकडुन माहिती मिळविण्यासाठी तयार केलेली प्रश्नांची एक क्रमबद्ध सुची म्हणजे प्रश्नावली होय. प्रश्नावली ही पोष्टाने संबंधित व्यक्तीकडुन पाठविली जाते. संबंधित व्यक्ती किंवा उत्तरदाते प्रश्नावली भरून संशोधनकर्त्याकडे पाठवितात. मूलभूत स्वरूपात प्रश्नावली ही, प्रेरणांचा असा समुह आहे की, जी शिक्षित लोकांपुढे या प्रेरणेच्या अंतर्गत त्यांच्या मौखिक व्यवहारांचे निरीक्षण करण्यासाठी प्रस्तुत केली जाते. प्रश्नावली विविध व्यक्तींना उत्तर देण्याकरिता तयार करण्यात आलेली एक तालिका होय. किंवा विस्तृत क्षेत्रात मोठया संख्येने पसरलेल्या किंवा एखादया निवडलेल्या लहान क्षेत्रात पसरलेल्या लोकांकडुन मर्यादित प्रमाणात तथ्ये संकलन करण्याची सुलभ पद्धती म्हणजे प्रश्नावली होय.



Scanned by CamScanner

**आदर्श प्रश्नावलीची वैशिष्टये : Characteristics of Good Questionnaire**

१. संशोधन समस्येचे स्वरूप सैद्धांतीकदृष्टया महत्वपूर्ण असावे.

२. प्रश्नांचे स्वरूप मिश्र असावे.

३.प्रश्नांचे स्वरूप स्पष्ट व नि:पक्ष असावे.

४. प्रश्नांचा क्रम तर्कसंगत असावा.

५.वस्तुनिष्ठ स्वरूपाची उत्तरे मिळणारे प्रश्न असावेत.

६. प्रश्नावलीचा आकार योग्य असावा.

७. प्रश्नावलीची गुणवत्ता उच्चस्तरीय असावी.

८. प्रश्नवलीचे बाहय स्वरूप आकर्षक असावे.

**प्रश्नावलीचे प्रकार : Types of Questionnaire**

**अ. लुंडबर्ग यांनी प्रश्नावलीचे दोन प्रकार उल्लेखीत केले आहेत.**

१. तथ्य संबंधी प्रश्नावली.

२. मनोवृत्ती संबंधी प्रश्नावली.

**ब . लुंडबर्ग आणि श्रीमती पॉलीन यंग यांच्या मते :**

१. संरचित प्रश्नावली

२. असंरचित प्रश्नावली

३. बंदिस्त प्रश्नावली

४. मुक्त प्रश्नावली

५. चित्रमय प्रश्नावली

६. मिश्रित प्रश्नावली

**प्रश्ननिर्मितीतील धोके :**

१. द्विअर्थी प्रश्न टाळावेत

२. सूचक प्रश्न विचारणे टाळावेत

३. प्रश्नांतर्गत कठीण शब्द टाळावेत

४. संवेदनशील प्रश्न टाळावेत

५. निरर्थक प्रश्न टाळावेत

६. अमूर्त प्रश्न विचारले जाउ नयेत

७. प्रश्नांच्या उत्तरांचे पर्याय संदिग्ध नसावेत

८. मोठे प्रश्न शक्यतो टाळावेत

९. एकक अस्पष्ठ स्वरूपी नसावेत

**प्रश्नावली बांधणीचे टप्पे :**

१. संशोधन समस्येच्या कोणत्या पैलूंबाबत माहिती संकलित करावयाची ते ठरविणे.

२. प्रश्नावलीच्या प्रकारासंबंधी निर्णय

३. प्रश्नावलीचा कच्चा आराखडा

४. बाहय स्वरूपी मूल्यांकन

५. प्रश्नावलीतील प्रश्नांचे पुन:परीक्षण

६. प्रश्नावलीची पूर्व चाचणी करणे

७. प्रश्नावली प्रत्यक्ष भरण्यासंबंधीच्या सूचना देणे

**प्रश्नावली तंत्राचे गुण :**

१. वेळेची बचत

२. खर्चात बचत

३. विस्तृत क्षेत्राचा अभ्यास

४. संशोधनकर्त्यांच्या प्रभावापासून मुक्त

५. उत्तरदात्यांकडून उत्सफूर्त प्रतिसाद

६. गुप्त माहिती मिळणे शक्य

७. उद्दिष्टपूर्ण माहितीचे संकलन

८. सांख्यिकीय विश्लेषन करणे शक्य

९. अध्ययनाची पुनरवृत्ती शक्य

१०. विश्वसनीय व वस्तुनिष्ठ माहितीची शक्यता



Scanned by CamScanner